## (वेध गीत २००१ )

गीत गा रहे है आज हम,
रागिनी को ढूँढते हुए
आगए यहाँ जवा कदम,
जिंदगी को ढूँढते हुए ।।धृ।।

ये दिलो मे ये उमंग है,
हम जहाँ नया बसाऐंगे
जिंदगी का दौर आज से,
दोस्तो को हम सिखाऐंगे
फूल हम नये खिलाऐंगे,
ताजगीको ढूँढते हूए ।।

दहेज का बूरा रिवाज है,
आज देश मे, समाज में
है तबाह आज आदमी,
लूट पर टिके समाज में
हम समाज भी बनाऐंगे,
आदमी को ढूँढते हुऐ ।।

फिर न रो सके कोई दुल्हन,
जोर जुल्म का न हो निशान,
मुस्कुरा उठे धरा गगन,
हम रचेंगें ऐसी दास्ताँ
हम वतन को यू सजाऐंगे,
हर खुशी को ढूँढते हुए ।।

## वेध १९९९ :गीत

पूरब की तरफ चल,
सूरज की तरफ चल ।
हिंमत को साथ लिये,
सुख की तरफ चल ।।

राह में कही-न-कही ,
दर्द भी मिलेगा ।
उसको बाँटने के लिये,
दोस्त भी मिलेगा ।।

हँसने के लिये चल,
पढने केलिये चल ।।
किस्मत को हाथ लिये,
कल की तरफ चल ।।१।।

आनेवाले कल मे होगा,
खट्टा-मीठापन ।
ज्ञान की प्रकाश में,
उठेगा खिल चमन ।।

समता की तरफ चल,
ममता की तरफ चल ।
शांती की आस लिये,
सब की तरफ चल ।। २।।

**अभ्यासाचा कंटाळा,** अन् झोप येते फार ।
कंटाळ्याला सांगू आता, गोष्टी युक्तीच्या चार।।
१)भविष्यातली स्वप्ने माझी, करण्याला साकार ।
कष्टश्रमाच्या या मार्गाचा, केला मी स्वीकार ।।
२)आळसातुनी आळस जन्मे, बोथट बुध्दी पार ।।
उद्दीष्टांशी इमान देई, उत्साहाला धार ।।
३)क्षणाक्षणाच्या परिश्रमाविना, यश नाहीमिळणार।
त्याशिवाय मग आनंदाची, गोडी कशी टिकणार।।
४)स्फुर्ती गीत हे तुमचेमाझे, ओठी आता बसणार।
परिक्षेतला अवघड रस्ता, मैत्रीने हसणार ।।

## वेध गीत – २००६

नील गगन, हरीत धरा, शुभ्रतेत न्हात झरा
हिमशिखरी किरणांचा, लालकेशरी ग तुरा
चित्र मिळून सारे, रोज रेखू या
प्रगल्भ भारताचे निशाण होऊया.

केशरिया शक्ती देत, हिरवी ती निर्मिती,
समतेचा धवलरंग, चक्र असे नित्यगती
रंग जीवनाचे रंगून गाऊया
प्रगल्भ भारताचे निशाण होऊया.

ध्वज माझा स्फुर्तीदायी, ध्येयाप्रत नेई
कृष्णमेघ जमले तरी धैर्य मला देई
प्रयत्न हेच रत्न, ओंजळीत ठेऊया
प्रगल्भ भारताचे निशाण होऊया.

उन्नतीचे आत्मगीत गातसे तिरंगा
भक्तीनेच ईशरुप, येतसे अभंगा
विश्वास उजळणारा, विश्वास देऊया
प्रगल्भ भारताचे निशाण होऊया.

## (वेध गीत:२००२)

जोश, मस्ती अपने अंदर,
हम है वोही कलंदर
मेहनत जिनकी मुठ्ठीमें है,
उनका नाम सिकंदर

खुदकी कमाई नही है जिसकी,
उसकी झोली खाली
गर्व नहीं है जिसें देशपर,
उसकी राह निराली
हरीभरी इस धरतीमाँको,
और बनाओ सुंदर ।। १।।

साथ हमारे आओ प्यारे,
देखे नये नजारे
भविष्य नीला आसमान,
हम छोटे बडे सितारे
सर है उँचा,पैर है पक्के,
इस मिट्टीके अंदर ।। २।।

अपना सुख देखें लेकीन,
औरोंके घर भी बसाओ
जाति-धरम के नाम पर,
मानवताको न जलाए
परंपरासे गहरा रिश्ता,
नयी दिशाका आदर ।।३।।

## (वेध गीत -२००५)

कर्तव्याचे होई गाणे, तन्मयतेची तान।
परिश्रमाच्या वेलीवरचे
यश सोनेरी पान।।धृ।।
अशी कल्पना मनात यावी,
तिचाच व्हावा ध्यास
त्या ध्यासातून उमलत जाई,
रोज नवा अभ्यास
अभ्यासातून उमगत जाई,
पूर्ण जगाचे भान ।।१।।

थकल्यावरही ध्येय ऊरीचे,
रोज असावे जागे
पहाट होता, नव्या दमाने,
मन मार्गाला लागे
मतीकृतीतील सरता अंतर,
योग साधतो छान।।२।।

पावलातली शक्ती माझ्या,
ह्रदयी उतरत जाई
मंत्र उद्याचा, हर श्वासाला,
नवी उभारी देई
प्रवास झाला मधुर-निरामय,
उन्नत हो अभिमान।।३।।

कर्तृत्वाच्या शिखरावरही,
नसती हेवे दावे,
यशातले आनंदज्ञान
सर्वांचे होऊन जावे
नम्रतेतला सुगंध पसरे
हिरवे अवघे रान ।। ४।।

## (वेध गीत -२००४)

सवयीच्या सुपर हायवेवर, कधीच नसतात काटे /
नवीन रस्ता शोधत-खोदत माझे "मी" पण भेटे //

नेहमीच्या रस्त्याभोवती थंडगार झाडे
प्रत्येक सिग्नल ओळखीचा, अन् छोटेमोठे खड्डे
पावलोपावली प्रश्न घेऊनी आली नवीन वाट
सुरुंग लावा, डोंगर फोडा जोडा नवीन घाट
श्रमलेल्या रात्रीच्या मुठीत जपले स्वप्न छोटे
नवीन रस्ता शोधत-खोदत माझे "मी" पण भेटे //

तुच्छ टीकेच्या नजरांची, रोज जमावी गर्दी
असह्य व्हावे अेकाकीपण, उत्साहाला ओहोटी
अशात यावा हात मदतीचा सूर जमावे छान
पुन्हा अेकदा उंच स्वराने नवीन घ्यावी तान.
मस्तीमध्ये प्रवास सरतो, ध्येय ऊरीचे मोठे
नवीन रस्ता शोधत-खोदत माझे "मी" पण भेटे //

मुक्कामावर वळून पहावे, जमू लागते रांग
वाट आमुची म्हणणाऱ्यांचा, ओघच जणू अथांग
यशकिर्तीच्या शिखरावर, ज्ञानाची दिवली तेवे
अनुभव अपुले दुसऱ्यांसाठी, मुक्तपणे वाटावे.
हसणाऱ्या चेहऱ्यांवर आता आदरकौतुक दाटे
नवीन रस्ता शोधत-खोदत माझे "मी" पण भेटे //

## (वेध गीत:२००३)

नवे नवे, मला हवे घेऊनि सवे
जुने जुने, ते कालचे रोज आठवे ।।

काल अन् उद्याची भेट आज ही
त्यात विवेकाचे रोप लावू दे ।। धृ ।।

काय जपावे अन् काय सोडू मी ?
कोणते प्रमाण अन् कोणती हमी ?

अनंत शक्यतांची एक जाणीव
शक्ती काय माझ्या काय उणीव
तर्क,ज्ञान, प्रेम ही माझी साधने
मंथनास या जरा दिशा लाभू दे ।।१।।

रंग या जगाचे रोज बदलती
व्यक्ती आणि नाती पक्की कोणती ?

हट्टी विचारांना ठेवू बाजूला
आपल्या सुखाशी, समाज जोडूया
संयमी मनाचे मधुर चांदणे
भविष्य समाधानी त्यात उगवू दे ।।२।।

## (वेध - २००० : गीत)

नव्या शतकाचे गाणे,
गाऊया हो सारे
मनाच्या आभाळी,
चमकती स्वप्नतारे ।।धृ।।

इच्छेचे मखर,
त्यात श्रमाचे झुंबर ।
प्रयत्नांचा ताल,
त्याची लय हो सुंदर ।।

वाजतगाजत येई भविष्याची मुर्ती ।
बुध्दी हे मस्तक आणि ह्रदयात स्फुर्ती ।।

हातामध्ये बळ आहे ज्ञानविज्ञानाचे ।।
मुकुटमण्याचे तेज संगणकाचे ।।

तीक्ष्ण चक्र हाती,
आणि कोवळे कमळ ।।
संकल्पाच्या धनुष्याला,
संयमाचे बळ

माझ्या ओठावर यावे,
समाधानी गीत ।
माझ्याबरोबर,
माझ्या देशाचेहि हित ।।